# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ९२-२२** **दिनांक :-२९/०३/२०२२**

## जुलुमाने खंडणीचे पैसे उकळणा-या टोळीस जेरबंद करण्यात नवघर गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

दि. २५.०३.२०२२ रोजी तक्रारदार श्री. प्रमोद रावल, वय ५७ वर्षे, यांनी नवघर पोलीस ठाण्यात येऊन माहिती दिली की, त्यांना मागील एक ते दिड महिन्यापासुन एक अनोळखी ज्योती नावाची महिला फोन करुन भेटण्यासाठी बोलावत होती. दि. २३.०३.२०२२ रोजी ज्योती नावाचे महिलेने तक्रारदार यांना शिर्डीनगर, भाईंदर पुर्व येथे भेटण्यासाठी बोलविले व नमुद महिलेने तक्रारदार यांना एका बिल्डींगमधील रुममध्ये नेले. त्या ठिकाणी त्या ज्योती नावाच्या महिलेने तक्रारदार यांचे शर्ट काढुन त्यांचेशी अंगलगट करीत असताना तेथे तीन अनोळखी इसम येऊन तक्रारदार यांना ते पोलीस असल्याचे सांगुन त्यांचेविरुध्द पोलीस केस दाखल करणार अशी धमकी दिली. त्यावेळी त्या तीन पोलीसांनी केस दाखल न करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे २ लाख रु. ची मागणी करुन ४५,०००/- रु. व ए.टी.एम. कार्डने २५,०००/- रु. घेऊन उर्वरीत रक्कम दोन दिवसांनी देण्यास सांगितले.

माहितीचे अनुषंगाने मा.वरिष्ठांनी सापळा कारवाई करण्याचे दिलेल्या आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तक्रारदार यांचेकडे पैश्यांचे आकाराचे कागदी बंडल तयार करुन एका खाकी लखोट्यात टाकुन दिले. त्यानंतर तक्रारदार यांच्याकडुन जुलुमाने खंडणीचे पैसे घेण्यासाठी वेस्टर्न हॉटेल, काशिमिरा येथे येणारे इसमांना सापळा कारवाई मध्ये पकडण्यासाठी पंचासह वेस्टर्न हॉटेल येथे सापळा रचला. सदर दिवशी तक्रारदार यांच्याकडुन जुलुमाने खंडणीचे पैसे स्विकारत असताना दोन इसमांना पोलीस पथकाने रंगेहात ताब्यात घेतले. तसेच त्या दोघा इसमांचा तिसरा साथीदार व तक्रारदार यांना फोन करणारी महिला यांना सुध्दा ताब्यात घेतले. सदरबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २३४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४१९, ४२०, ३८९, ३८४, ३६३, ३४७, १७०, १२० (ब), ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयात तक्रारदार यांच्याकडुन जुलुमाने खंडणी घेणारे आरोपी इसम १) सुदर्शन बिबीशन खंदारे, वय ३२ वर्षे, रा. आदर्श इंदिरा नगर, भाईंदर पुर्व, २) विजय तुकाराम पाटील, वय ५६ वर्षे, रा. विरार पुर्व, ता.वसई, जि. पालघर व ३) आयुब रेहमान खान, वय ४५ वर्षे, रा. श्रीराम ज्वेलर्सचे मागे, भाईंदर पुर्व, व एक महिला यांना अटक करुन गुन्हयाची उकल केलेली आहे.

सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री. अमीत काळे, सहा.पो.आयुक्त श्री. डॉ. शशीकांत भोसले, नवघर विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मिलिंद देसाई, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/योगेश काळे, पोउनि/संतोष धाडवे, पोहवा/ भुषण पाटील, पोना/गणेश जावळे, पोशि/संदिप जाधव, ओमकार यादव, सुरज घुनावत, विनोद जाधव यांनी केलेली आहे.

---ooo---